# मुंबई विद्यापीठ
## आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग
विद्यापीठ विद्यार्थी भवन 'बी' रोड,चर्चगेट, मुंबई - 400 020

**website : www.mudlle.ac.in, Phone (Dir) : 22043478 Telefax : 22813020**


आ.अ.वि.वि/ विस्तार /611 अ of 2011
जानेवारी 18, 2011

**परिपत्रक क. 6**

प्रति,
**प्राचार्य,**
**मुंबई विद्यापीठाशी सलग्न,**
**कला, वाणिज्य, शास्त्र, फॉर्मसी, इंजिनिअरींग आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालये**

**(मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयासाठी)**

**विषय ः दि.7 फेब्रुवारी ते 24 फेब्रुवारी 2011 रोजी संपन्न होणा-या वार्षिक महोत्सव " उडान 2011" मधील आपल्या महाविदयालयाच्या सहभागाबाबत**

महोदय/ महोदया,

मुंबई विदयापीठाच्या "आजीवन अध्ययन आणि विस्तार" विभागा मार्फत संपन्न होणारा विस्तार कार्याचा वार्षिक महोत्सव **"उडान 2011"** यावाबत आपणास माहीती असेलच. दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांमध्ये विकेंद्रीत पध्दतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातील "पथनाटय स्पर्धा व भित्तीचित्र स्पर्धा" यामध्ये आपल्या महाविदयालयाचा सहभाग आवश्यक आहे.

स्पर्धाः

- **"उडान 2011 - विस्तार कार्याची गरूडझेप"** विस्तार कार्याच्या वार्षिक महोत्सवात पुढील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**1. पथनाटय स्पर्धा**

- पुढे दिलेल्या कोष्टकानुसार आपल्या महाविदयालयाने सहभाग घेतलेल्या विस्तार कार्यप्रकल्पापैकी **(कोणत्याही एका)** प्रकल्पावर पथनाटय सादर करावे.
- आपणास विनंती करण्यात येते की, पथनाटय (Street Play) व भित्तीचित्र (Poster) स्पर्धेसाठी केवळ **सांकेतिक कमांकाचा** वापर करावा. हे सांकेतिक कमांक स्पर्धच्या दिवशी आपणास देण्यात येतील. स्पर्धेवेळी महाविदयालयाचे **नाव उघडकीस येईल असे कोणत्याही प्रकारचे कृत्य करण्यास प्रतिबंध आहे.**
- पथनाटय सादरीकरण्यासाठी केवळ 10 मिनिटांचा अवधी आहे.
- पथनाटय केवळ पथनाटय स्वरूपातच सादर करण्यात यावे. म्हणून पथनाटयात सर्वसाधारणपणे वापरात येणारी वादये जसे मोबाईल, टेपरेकॉर्डर,तबला, बासरी, तंतुवादय, पेटी वगैरे साधने वापरण्यास अनुमती आहे.
- पथनाटयामध्ये कलाकार, गायक, संगीतकार व इतर यांच्यासहीत जास्तीत जास्त 15 विदयार्थी सहभाग घेऊ शकतात.या 15जणांसहीत अधिक 5 जण व 2 विस्तार शिक्षकांसह असे एकूण 22 जण महोत्सवात सामील होऊ शकतात.
- पथनाटयातील पात्रांची वेशभूषा पथनाटयास पूरक व अनुरूप असावी मात्र तंतोतत असावीच असे नाही.
- पथनाटयाचे मूल्यमापन व गुणांकन, पथनाटयाचा विषय, अभिनय, सादरीकरण, संपूर्ण परिणाम आणि संदेश निर्गमन याआधारे करण्यात येईल.

**2. भित्तीचित्र स्पर्धा ः**

जे विस्तार कार्य प्रकल्प आपल्या महाविदयालयात राववण्यात येत आहेत **केवळ त्यांचीच (प्रत्येकी एक)** भित्तीचित्रे 28"× 22" इंच आकाराच्या कार्डपेपरवर वनवावीत. ***(उदा. ः जर आपल्या महाविद्यालयात दोन प्रकल्प राबवण्यात येत असतील तर त्या प्रत्येक प्रकल्पाचे केवळ एक असे एकूण दोन भित्तीचित्र आपल्या महाविद्यालयामार्फत सादर करावीत.)** ही भित्तीचित्रे पुठठा, थर्माकोल किंवा तत्सम इतर कोणत्याही साहित्यावर चिकटवू नयेत जेणेकरून ही भित्तीचित्रे गुंडाळून आणणे सोपे जाईल.ही भित्तीचित्रे आपल्या महाविदयालयाच्या स्पर्धेतील सादरीकरणाच्या एक दिवस अगोदर स्पर्धेच्या ठिकाणी पोहचवावीत.

स्पर्धेतील आपल्या महाविदयालयाच्या सहभागाची तारीख आपणास पाठविलेल्या परिपत्रकांद्वारे कळविण्यात आली आहे.

निबंध लेखन ः

प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यकमाच्यावेळी विस्तार कार्य शिक्षक व विदयार्थी व्यवस्थापकांना दिलेल्या उपयुक्त माहीती साहित्यामध्ये दिलेल्या विषयापैकी (कोणत्याही एका विषयावर) सुमारे 1500 शब्दात **वार्षिक महोत्सवात सहभाग (उडाण) न घेतलेल्या** विदयार्थ्यांनी निबंध लिहीणे कमप्राप्त आहे. सदर निबंध A4 आकाराच्या कागदावर लिहावा. विस्तार कार्य शिक्षक हा निबंध तपासतील व या निबंधास गुणवत्तेनुसार A+, A, B, C, D यापैकी श्रेणी देतील. हे सर्व निबंध आपल्या महाविदयालयाच्या क्षेत्र समन्वयकांच्या सहीनिशी विस्तार कार्य प्रकल्पांच्या 10 गुणांसाठीच्या वार्षिक पर्यवेक्षण व मूल्यमापन प्रकिये वेळी संबंधित केंद्रावर घेऊन यावेत.त्यावाबतचे वेळापत्रक व अतिरिक्त माहीती लवकरच पुढील परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येईल.

तूर्तास, वार्षिक महोत्सवातील सहभागासाठी हार्दिक शुभेच्छा!

विशेष सन्माननीय अतिथी म्हणून आपणही या महोत्सवाचा आस्वाद घ्यावा असे आपणास आग्रहाचे निमंत्रण !

कळावे,
आपला विश्वासू

sd/-
**डॉ.दिलीप शं. पाटील**
**प्राध्यापक आणि संचालक**